ePaper

## 'आखातात अमेरिकेला स्थान असेल तर फक्त समुद्राच्या तळाशी'; खामेनी कडाडले

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™



पान 2 वरुन...

बलिकेवरील अत्याचारामुळे भोर हादरलं!

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 03 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### सशस्त्र दल पूर्णपणे सज्ज', इराणच्या लष्करी अधिकाऱ्याच्या वक्तव्याने खळबळ

# अमेरिका-इराण युद्ध पुन्हा भडकणार?



**महाईन्यूज । इराण**

**अमेरिका-इराणमधील युद्धाचा वणवा पुन्हा पेटणार की आता युद्धविराम कायम राहणार? याबाबतचा प्रश्न सध्या संपूर्ण जगाला सतावत आहे. अमेरिका-इराणमधील युद्ध तब्बल एक महिना सुरू होतं. मात्र, त्यानंतर अखेर ८ एप्रिल २०२६ रोजी दोन्ही देशांनी युद्धविरामाची घोषणा केली होती. तसेच या युद्धावर कायमचा तोडगा काढण्यासाठी शांतता करार करण्यासाठी पाकिस्तानच्या माध्यमातून चर्चेच्या फेऱ्या सुरू आहेत. पण तरीही अद्याप कोणताही ठोस निर्णय झालेला नाही.**

यातच आता आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे. अमेरिका-इराण युद्ध पुन्हा भडकण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कारण अमेरिका करारांप्रति वचनबद्ध नसल्याचा दावा इराणने केला आहे. तसेच इराणच्या लष्करी अधिकाऱ्यानेही एक मोठं वक्तव्य केल्याने खळबळ उडाली आहे.

मोहम्मद जाफर असदी यांनी इराणच्या फार्स न्यूज एजन्सीने प्रसिद्ध केलेल्या एका निवेदनात हे भाष्य केलं. असदी यांनी आरोप केला की, "अमेरिकेच्या अधिकाऱ्यांच्या अलीकडील कृती आणि विधानांचा अभ्यास केला तर राजनैतिक सामंजस्याप्रती वचनबद्धतेचा अभाव दिसून येत आहे. कारण अमेरिकी अधिकाऱ्यांच्या कृती आणि विधानं प्रामुख्याने प्रसिद्धीसाठी प्रेरित असल्याचं दिसून येत आहे. त्यांचा पहिला उद्देश तेलाच्या किंमती कमी होण्यापासून रोखणं आणि दुसरं म्हणजे त्यांनी निर्माण केलेल्या गोंधळातून स्वतःची सुटका करून घेणं हाच असल्याचं दिसत आहे."

"पण इराणचं सशस्त्र दल सतर्क आहे. कारण कोणत्याही प्रकारच्या वाढत्या तणावाला प्रत्युत्तर देण्यासाठी इराणचं सशस्त्र दल सज्ज आहे. अमेरिकेकडून होणाऱ्या कोणत्याही नवीन साहसी कृत्यांसाठी किंवा मूर्खपणासाठी आमचं सशस्त्र दल पूर्णपणे तयार आहे", असं मोहम्मद जाफर असदी यांनी म्हटलं आहे.

होर्मुझची नाकेबंदी खुली करण्याबाबत मांडलेला प्रस्ताव नाकारल्यानंतर इराणने आता अमेरिकेसमोर नवा प्रस्ताव ठेवला आहे. या आठवड्यातील हा दुसरा प्रस्ताव आहे. शांतता चर्चेत मध्यस्थी करणाऱ्या पाकिस्तानकरवी इराणने हा प्रस्ताव सादर केल्याचे वृत्त आयआरएनए या इराणी वृत्त संस्थेने प्रसिद्ध केले. पण, आण्विक कार्यक्रमाबाबतच्या चर्चेला आग्रही असणारी अमेरिका या नव्या प्रस्तावाला काय उत्तर देणार याकडे आता जगाचे लक्ष लागले आहे. 'आयआरएनए' या इराणी वृत्त संस्थेने प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार, "इराणने नवा प्रस्ताव गुरुवारी रात्री मध्यस्थी पाकिस्तानकडे सोपवला आहे". इराणी परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बाकाई यांनी एका दूरचित्रवाणी मुलाखतीत अमेरिकेबरोबर वाटाघाटींमध्ये युद्ध समाप्ती आणि शाश्वत शांतता प्रस्थापित करणे हेच तेहरानचे मुख्य उद्दिष्ट आहे असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, अमेरिकेने इराण विरोधातील संघर्षात ०७ एप्रिल रोजी दोन आठवड्यांसाठी युद्धविरामाची घोषणा केली होती. ही मुदत समाप्त झाल्यानंतर पाकिस्तानच्या विनंतीवरुन हा युद्धविराम अनिश्चित काळासाठी वाढविण्यात आल्याची माहिती स्वतः ट्रम्प यांनी दिली आहे. महमूद नबावियान हे इराणच्या अणुकराराच्या वाटाघाटी करणाऱ्या पथकाचे सदस्य आहेत. त्यांनी शुक्रवारी एका व्हिडिओ संदेशाद्वारे हा इशारा दिला. नबावियान यांच्या मते, जर अमेरिकेने किंवा इस्रायलने इराणच्या नेत्यांची हत्या करण्याचा प्रयत्न केला आणि त्यामध्ये आखाती देशांनी (उदा. सौदी अरेबिया, युएई इ.) मदत केली, तर त्याचे परिणाम भीषण असतील. नबावियान यांनी स्पष्ट केलं की, इराण केवळ हल्ला करणाऱ्या देशावरच नाही, तर त्यांना साथ देणाऱ्या प्रादेशिक सत्ताधिशांवरही थेट हल्ला करेल. त्यांनी आखाती देशांना बजावलं आहे की, त्यांच्या भूमीवर असलेले अमेरिकन किंवा परदेशी लष्करी तळ इराणविरुद्ध वापरू दिले जाऊ नयेत. जर या तळांवरून इराणवर हल्ले झाले, तर त्या देशांना 'गुन्हेगार' मानले जाईल. या हल्ल्यात सहभागी होणारे कोणतेही राज्यकर्ते सुरक्षित राहणार नाहीत.

### इराणच्या सशस्त्र दलांनी काय म्हटलं?

मोहम्मद जाफर असदी हे इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स (IRGC) मधील एक इराणचे वरिष्ठ लष्करी अधिकारी आणि ब्रिगेडियर जनरल आहेत. त्यांनी म्हटलं की, 'अमेरिका-इस्रायल युद्ध पुन्हा सुरू होण्याची शक्यता आहे. कारण समोर आलेले पुरावे हेच दर्शवतात की अमेरिका कोणत्याही करारांप्रति किंवा संधींप्रति वचनबद्ध नाही', असा दावा त्यांनी केला आहे.

### त्यांचे राजवाडे उद्ध्वस्त करू

इराणच्या एका वरिष्ठ खासदाराने शेजारील आखाती देशांना गंभीर इशारा दिला. "जर इराणच्या नेत्यांवर किंवा सर्वोच्च नेतृत्वावर कोणताही हल्ला झाला, तर त्याला साथ देणाऱ्या आखाती देशांच्या राज्यकर्त्यांना जिवंत सोडलं जाणार नाही आणि त्यांचे राजवाडे उद्ध्वस्त केले जातील," असं प्रक्षोभक विधान इराणचे खासदार महमूद नबावियान यांनी केलं आहे.

# बलिकेवरील अत्याचारामुळे भोर हादरलं!

## नरसापुरात संतप्त ग्रामस्थांचा मोर्चा; महामार्गावर पोलिसांचा आंदोलकांवर लाठी चार्ज

**महाईन्यूज । पुणे**

**भोर तालुक्यातील नरसापुर गावात तीन वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिची हत्या झाल्याच्या धक्कादायक घटनेनंतर संपूर्ण परिसरात संतापाचे वातावरण आहे. या अमानुष घटनेच्या निषेधार्थ ग्रामस्थांनी गुरुवारी मोठा आक्रोश मोर्चा काढत आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी केली. गावातील वातावरण तणावपूर्ण असून संपूर्ण नरसापूर बाजारपेठ बंद ठेवण्यात आली आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, ६५ वर्षीय भीमा कांबळे या वृद्ध व्यक्तीवर तीन वर्षांच्या चिमुकलीला जनावरांच्या गोठ्यात नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. या अत्याचारानंतर चिमुकलीचा मृत्यू झाल्याने गावात संतापाची लाट उसळली. घटनेची माहिती समोर येताच ग्रामस्थ मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले.

ग्रामस्थांनी नरसापूर ग्रामपंचायत कार्यालयापासून पुणे-सातारा महामार्गापर्यंत मोर्चा काढला. संतप्त नागरिकांनी आरोपीला ग्रामस्थांच्या ताब्यात देण्याची मागणीही केली.

मोर्चामध्ये महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अनेकांनी अशा विकृत प्रवृत्तीच्या आरोपींना कठोर शिक्षा झाली पाहिजे, अन्यथा अशा घटना थांबणार नाहीत, अशी भावना व्यक्त केली.

घटनेनंतर कायदा आणि सुव्यवस्था बिघडू नये म्हणून पोलिसांनी गावात मोठा बंदोबस्त तैनात केला आहे. पुणे ग्रामीण पोलिसांचे वरिष्ठ अधिकारी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. गावात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी अतिरिक्त पोलिस फौजफाटा मागवण्यात आला आहे.

या घटनेमुळे संपूर्ण परिसर हादरला असून चिमुकलीच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ग्रामस्थांनी आरोपीवर न्यायालयात खटला चालवून कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे.

दरम्यान, पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे पुन्हा एकदा महिलांवरील आणि लहान मुलांवरील वाढत्या अत्याचारांच्या घटनांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

### आरोपीला ताब्यात द्या; नसरापूरकरांची मागणी

नसरापूरमध्ये एका नराधम वृद्धाने साडेतीन वर्षाच्या चिमुरडीवर अत्याचार करून, दगडाने ठेचून खून केला. या घटनेनंतर नागरिकांमध्ये मोठी संतापाची लाट उसळली आहे. "आरोपीला फाशीची शिक्षा झालीच पाहिजे, आरोपीला आमच्या ताब्यात द्या, आम्ही त्याला ठेचून मारू" असा पवित्रा येथील गावकऱ्यांनी घेतला आहे. घटनेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे आज सकाळपासून हजारो नागरिक रस्त्यावर उतरले असून तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. सध्या नसरापूर वेल्हे रस्त्यावर ग्रामस्थ आणि महिलांनी ठिय्या मांडला असून जोपर्यंत जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हाधिकारी येत नाहीत तोपर्यंत ठिय्या आंदोलन सुरूच ठेवणार असल्याचा पवित्रा घेत पुन्हा पुणे सातारा महामार्गावर रास्ता रोको करण्यात आला आहे. पदयात्रामध्ये नसरापूरतील नागरिक, जिल्हा परिषद सदस्य पंचायत समिती, सदस्य विविध संघटनेचे पदाधिकारी तसेच जवळपास हजारो नागरिक उपस्थित होते.

# २८ लाखांची लाच घेताना महिला पोलीस अधिकारी जाळ्यात

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे पोलीस दलातून बदली झालेल्या आर्थिक गुन्हे शाखेतील सहायक पोलीस निरीक्षक महिलेला तक्रार अर्जाच्या चौकशी प्रकरणात २८ लाख रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) बंडगार्डन रस्त्यावर पकडले. या प्रकरणात एका खासगी व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले असून, बंडगार्डन रस्त्यावरील एका तारांकित हॉटेलसमोर शनिवारी ही कारवाई करण्यात आली. २८ लाख रुपयांची लाच घेताना महिला पोलीस अधिकाऱ्याला पकडल्यानंतर पुणे पोलीस दलात खळबळ उडाली.**




या प्रकरणी सहायक पोलीस निरीक्षक वैशाली तोटेवार यांच्यासह एकाला ताब्यात घेण्यात आले आहे. तोटेवार यांना ताब्यात घेतल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने तोटेवार यांच्या पुणे पोलीस आयुक्तालयातील कार्यालय, तसेच निवासस्थानाची झडती घेण्यास सुरुवात केली. तोटेवार यांच्यासह आणखी एकाविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू असून, या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यांना अटक करण्यात येणार असल्याची माहिती एसीबीच्या अधिकाऱ्यांनी दिली.

तोटेवार या पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेत नियुक्तीस होत्या. त्यांची नुकतीच पदोन्नतीने मुंबई लोहमार्ग पोलीस दलात पोलीस निरीक्षक म्हणून बदली करण्यात आली. त्यांना शुक्रवारी (१ मे) पुणे पोलीस दलातून कार्यमुक्त करण्यात आले. पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेत त्या नियुक्तीस असताना त्यांच्याकडे आठ ते नऊ तक्रार अर्ज चौकशीसाठी सोपविण्यात आले होते. त्या पैकी एका तक्रार अर्जाच्या चौकशीच्या अनुषंगाने सहायक निरीक्षक तोटेवार यांनी तक्रारदाराकडे ३० लाख रुपयांची लाच मागितली होती. तक्रारदाराने सुरुवातीला दोन लाख रुपये तोटेवार यांना दिले होते. त्यानंतर उर्वरित २८ लाख रुपयांची लाच त्यांनी मागितली. त्यानंतर तक्रारदाराने तक्रार दिली होती. तक्रारीची पडताळणी करण्यात आल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शनिवारी बंडगार्डन रस्त्यावरील एका तारांकित हॉटेलसमोर सापळा लावला. तोटेवार यांनी एका खासगी व्यक्तीला लाचेची रक्कम स्वीकारण्यासाठी तेथे पाठविले. सापळा लावून त्याला पकडण्यात आले.

### कार्यालय आणि निवासस्थानी छापा

ही कारवाई केल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने तोटेवार यांच्या पुणे पोलीस आयुक्तालयातील कार्यालय, तसेच निवासस्थानी छापा टाकून झडती घेतली. पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अतिरिक्त अधीक्षक अजित पाटील, अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने ही कारवाई केली.

# शासकीय सुट्टीच्या दिवशी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची वायसीएम रुग्णालयाला भेट

## आरोग्य सुविधांचा घेतला सखोल आढावा घेतला; रुग्णांशी साधला थेट संवाद साधला

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आज शासकीय सुट्टीच्या दिवशी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय (वायसीएमएच) आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका पदव्युत्तर संस्थेला अचानक भेट देत विविध विभागांची पाहणी केली. यावेळी त्यांनी रुग्णालयातील आरोग्य सुविधा, उपचार व्यवस्था, वैद्यकीय यंत्रणा तसेच नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा सविस्तर आढावा घेतला.**



> वायसीएम रुग्णालयाला भेट देऊन येथे उपलब्ध असलेल्या आरोग्य सुविधांचा प्रत्यक्ष आढावा घेतला. तसेच उपस्थित रुग्णांशी आणि त्यांच्या नातेवाईकांशी संवाद साधून त्यांच्या अडी-अडचणी समजून घेतल्या. रुग्णालयातील उपलब्ध सुविधा, डॉक्टर, परिचारिका व कर्मचाऱ्यांमार्फत देण्यात येत असलेल्या सेवा समाधानकारण असल्याचे उपस्थितांनी व्यक्त केले. नागरिकांना अधिक दर्जेदार, तत्पर आणि सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे.
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी अतिदक्षता विभाग (ICU), नवजात शिशु अतिदक्षता विभाग (NICU), मेडिसिन विभाग, शस्त्रक्रिया विभाग, बालरोग विभाग, अस्थिरोग विभाग, कान-नाक-घसा विभाग (ENT), दंतचिकित्सा विभाग, अल्ट्रासोनोग्राफी विभाग (USG), क्ष-किरण विभाग (X-RAY), डायलिसिस विभाग, बाह्यरुग्ण विभाग (OPD), आपत्कालीन विभाग तसेच उष्माघात कक्षाची पाहणी केली. प्रत्येक विभागातील उपचार पद्धती, रुग्णसंख्या, वैद्यकीय सुविधा, उपलब्ध उपकरणे आणि सेवा व्यवस्थेबाबत त्यांनी माहिती घेतली.

भेटीदरम्यान आयुक्तांनी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांशी थेट संवाद साधत रुग्णालयात मिळणाऱ्या सुविधांबाबत अभिप्राय जाणून घेतला. यावेळी उपस्थित रुग्णांनी त्यांना मिळत असलेल्या सेवा सुविधांबद्दल समाधान व्यक्त केले. आरोग्य सेवा अधिक परिणामकारक, तत्पर आणि नागरिकाभिमुख पद्धतीने देण्यासाठी आवश्यक त्या सूचना आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार यांनी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना रुग्णालयातील विविध विभाग, उपलब्ध सुविधा, वैद्यकीय सेवा, मनुष्यबळ तसेच भविष्यातील नियोजन याबाबत सविस्तर माहिती देत सादरीकरण केले. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय हे पिंपरी चिंचवड शहरातील महत्त्वाचे सार्वजनिक आरोग्य केंद्र असून येथे पदव्युत्तर वैद्यकीय संस्था, बी.एस्सी. नर्सिंग संस्था, वायसीएम ब्लड सेंटर, मासुळकर नेत्र रुग्णालय, स्वतंत्र ॲम्ब्युलन्स केंद्र अशा विविध सुविधा नागरिकांना येथे दिल्या जातात. शहरातील नागरिकांना परवडणाऱ्या आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात वायसीएम रुग्णालय महत्त्वाची भूमिका बजावत आहे. रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला सुलभ आणि दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे तसेच उपलब्ध सुविधांमध्ये सातत्याने सुधारणा करण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिले.

# पिंपरी चिंचवड शहरात भटकी कुत्री जोमात; प्रशासन कोमात

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**भोसरी परिसरात रस्त्यावर मोकाट कुत्र्यांच्या सुळसुळाट दिवसेंदिवस वाढत आहे. परिसरातील अंतर्गत रस्त्यांवर कुत्र्याने व मोकाट जनावराने उच्छाद मांडला आहे. या मोकाट जनावरांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. पालिकेच्या संबंधित विभागाने नागरिकांच्या या समस्यापासून सुटका करावी, अशी मागणी नागरिकांतून जोर धरत आहे.**



### प्रशासनाने नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे

एखादा कुत्रा किंवा पिसाळलेल्या कुत्र्याने एखाद्याला चावा घेतल्यानंतर महापालिकेची यंत्रणा आठवडाभरा पुरती जागी होती. त्यानंतर यंत्रणा कोमात जाते. शहरात भटक्या कुत्र्यांची समस्या वाढत आहे. नागरिकांचे हित लक्षात व सुरक्षा प्राधान्य देत पालिकेने परिसरातील मोकाट कुत्र्यांच्या कायमस्वरूपी बंदोबस्त केला पाहिजे. यासाठी नियमित निर्बीजकरण मोहिमा, लसीकरण आणि कुत्र्यांचे पुनर्वसन यावर भर देणे गरजेचे आहे. नागरिकांच्या तक्रारींवर तत्काळ प्रतिसाद देणारी स्वतंत्र यंत्रणा कार्यरत असावी. तसेच या समस्येवर दीर्घकालीन उपाययोजना आखून काटेकोर अंमलबजावणी करणे ही काळाची गरज आहे.

भोसरी परिसरातील नागरिक गेल्या अनेक दिवसांपासून मोकाट कुत्र्यांच्या समस्याने त्रस्त आहेत. परिसरातील उद्यान, मोकळे मैदानातील आवारात भटक्या कुर्त्यांनी चांगली दहशत माजवली आहे.

कुर्त्यांची झुंडी परिसरात फिरत असतात. ही सर्व कुत्री घोळक्यात असतात. कोणी नागरिकांनी कुत्र्यांना हाकलण्याचा प्रयत्न केला असता ते अंगावर धावून जातात. कुत्री दुचाकी वाहनचालकांच्या पाठीमागे धावत सुटतात. त्यामुळे वाहनचालक घाबरून व गडबडून जाऊन गाडीवरच्या ताबा सुटून अपघात होत आहे.

ह्या अपघातात बऱ्याच वाहनचालक किरकोळ व गंभीर स्वरुपात जखमी झाले आहेत. या त्रासातून पालिका प्रशासनाने भटक्या जनावरांचा व कुत्र्यांच्या जाचातून मुक्तता करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

मोकाट जनावरांचा नाहक त्रास भोसरीकरांना सहन करावा लागत आहे. वाहनचालकांना वाहन चालविताना मोठी कसरत करावी लागत आहे. ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, महिलांना रस्त्यावरून चालताना भटक्या कुर्त्यांची भीती निर्माण झाली आहे. मोकाट कुत्री येथील रस्त्यांवर बिनधास्तपणे बसलेली असतात. भटक्या कुत्र्यामुळे परिसरातील नागरिक, वाहनचालक व चाकरमानी त्रासलेल्या आहेत. वाहनांचा मागे लागत दुचाकी वाहनांनाही अपघाताच्या घटना घडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या समस्येमुळे रात्रीच्या वेळी नागरिकांची भीती अधिक वाढत असून, अनेकजण बाहेर पडण्यास टाळाटाळ करत आहेत. प्रशासनाने तातडीने निर्बीजिकरण व पुनर्वसनाची प्रभावी मोहीम राबवावी, अशी नागरिकांची ठाम मागणी आहे.



## भूमिका

**महाराष्ट्राच्या राजकारणात विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने जाहीर केलेल्या पाच उमेदवारांच्या यादीने मोठी राजकीय खळबळ उडवली आहे. या निवडी केवळ औपचारिक नसून, त्यामागे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची स्पष्ट रणनीती असल्याचे दिसून येते. 'धक्कातंत्र' म्हणून या निर्णयाकडे पाहिले जाते.**

# भाजपचे धक्कातंत्र आणि बदलते सत्तासमीकरण



अहिल्यानगर (नगर) जिल्ह्यातील कोल्हे पाटील आणि कर्जतकर या दोन उमेदवारांच्या निवडीने सर्वाधिक चर्चा रंगली आहे. नगर जिल्हा हा राज्याच्या राजकारणात नेहमीच प्रभावी राहिला आहे. कोपरगावच्या कोल्हे कुटुंबाला पुन्हा संधी देणे हे त्यांच्या राजकीय पुनर्वसनाचे पाऊल असले, तरी त्यामागे विखे गटाला अप्रत्यक्ष संदेश देण्याचा प्रयत्नही स्पष्ट दिसतो. विशेषतः सुजय विखे पाटील यांच्या लोकसभा पराभवानंतर त्यांना विधान परिषदेत स्थान मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र, ती संधी न मिळाल्याने आता त्यांचे राजकीय पुनर्वसन करण्याची जबाबदारी राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर येऊन पडली आहे.

याचवेळी कर्जत-जामखेडचे कर्जतकर यांची निवडही अनपेक्षित ठरली. ते गोपीनाथ मुंडे आणि एकनाथ खडसे यांच्या काळापासून सक्रिय असलेले कार्यकर्ते आहेत. त्यामुळे त्यांना मिळालेली संधी ही पक्षातील जुन्या निष्ठावंतांना दिलेली 'लॉटरी' मानली जात आहे. आधीच विधान परिषदेत राम शिंदे आणि सत्यजित तांबे यांसारखे नगर जिल्ह्याचे चेहरे असताना आणखी दोन सदस्यांची भर घालणे, हे रोहित पवार आणि विखे गटाला शह देण्याचे धोरण असल्याचे स्पष्ट होते.

कोकणातही भाजपने बदल करत माधव भांडारी यांच्याऐवजी प्रमोद जठार यांना संधी दिली आहे. हा निर्णय देखील पक्षातील जुने हिशेब चुकते करण्याचा भाग असल्याचे मानले जाते. दुसरीकडे, अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून झिशान सिद्दीकी यांना दिलेली उमेदवारी ही सत्ताधारी आघाडीत समन्वय राखण्याचा प्रयत्न म्हणून पाहिली जाते. मात्र, रावसाहेब दानवे यांच्या संदर्भातही अशाच समन्वयाच्या चर्चांनी राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त केले आहे.

दरम्यान, विधान परिषदेत उद्धव ठाकरे पुन्हा येणार का याबाबत मोठी उत्सुकता होती. मात्र, त्यांच्या पूर्वीच्या विधानांवरून आणि राजीनाम्याच्या निर्णयावरून ते पुन्हा सभागृहात येण्याची शक्यता कमीच मानली जात होती. पृथ्वीराज चव्हाण यांच्या आग्रहामुळे त्यांनी आपला कार्यकाल पूर्ण केला, परंतु यावेळी त्यांनी स्वतःऐवजी अंबादास दानवे यांचे नाव पुढे केले. या निर्णयामुळे काँग्रेसमध्ये नाराजीची भावना निर्माण झाली.

काँग्रेसने शिवसेनेला जागा देण्याची तयारी दाखवली असताना, त्यांच्या सल्ल्याचा विचार न झाल्यामुळे आघाडीत तणाव निर्माण झाल्याचे दिसून आले. भविष्यातील राजकीय समीकरणे लक्षात घेता, रमेश चेन्नीथला यांच्या पुढील हालचालींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राज्यसभेला शरद पवार यांना दिलेली संधी आणि विधान परिषदेत शिवसेनेला दिलेली जागा यामुळे काँग्रेसमध्ये अंतर्गत चर्चा आणि टीका सुरू आहे.

## प्रासंगिक »

### बढाईखोर माणूस

**एक माणूस फार वर्षे प्रवास करून आपल्या घरी आला व आपण परदेशात असताना काय मौजा पाहिल्या हे त्याने आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना तिखट मीठ लावून सांगितले.**

आणि अगदी शेवटी एक थाप ठोकून दिली की, 'मी अलकावतीला गेलो असता तेथील लोक पंधरा पंधरा हात उंच उड्या मारतात पण त्यांनी माझ्याशी पैज लावली असता माझ्याइतकी उंच उडी एकालाही मारता आली नाही.' ऐकणाऱ्या कोणालाही ही गोष्ट खरी वाटली नाही.

तेव्हा त्यांची खात्री करण्यासाठी तो नाना प्रकारच्या शपथा घेऊन लागला. त्या वेळी त्या लोकातील एक माणूस त्याला म्हणाला, 'अहो, अशा शपथा कशाला घेता. हातच्या कंकणाला आरसा कशाला ? या वेळी तुम्ही अलकावतीला आहात असं समजून तिथे जशी उडी मारली तशी इथंही मारून दाखवा म्हणजे झालं.' हे ऐकताच त्या बढाईखोर माणसाचे तोंड ताबडतोब बंद झाले.

- तात्पर्य : आपण प्रवासात पाहिलेल्या गोष्टी फुगवून सांगण्याची काही लोकांना सवय असते, पण एखादेवेळी त्यांचेच बोलणे त्यांच्या गळ्यात येऊन त्यांची फजिती झाल्याशिवाय राहात नाही.

भोर तालुक्यातील नसरापूर परिसरात घडलेली चार वर्षीय चिमुकलीवरील अत्याचार व हत्येची घटना केवळ धक्कादायकच नाही, तर समाजाच्या संवेदनशीलतेला हादरा देणारी आहे. अशा अमानुष कृत्यांमुळे मानवतेलाच काळीमा फासला जातो.

# निर्दयी वास्तवाचा आरसा

एका निष्पाप जीवावर इतक्या क्रूरपणे अत्याचार करून तिची हत्या करण्यात येणे ही केवळ कायद्याची नव्हे, तर सामाजिक मूल्यांचीही गंभीर घसरण दर्शवणारी बाब आहे.

या घटनेत ६५ वर्षीय आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले असले तरी, या प्रकरणामुळे समाजात निर्माण झालेली भीती आणि संताप सहजासहजी कमी होणार नाही. नागरिकांनी पुणे-सातारा महामार्गावर उतरून आंदोलन केले, ही त्यांची असहायता आणि रोष व्यक्त करण्याची तीव्र प्रतिक्रिया होती. लोकांना आता केवळ आश्वासने नकोत, तर ठोस आणि जलद न्याय हवा आहे.

अशा घटनांमुळे मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. घराबाहेरच नव्हे, तर घराजवळील परिसरातही मुली सुरक्षित नाहीत, ही वस्तुस्थिती चिंताजनक आहे. पालकांच्या मनात सतत भीतीचे वातावरण निर्माण होते. त्यामुळे केवळ पोलिस यंत्रणा नव्हे, तर संपूर्ण



समाजाने सजग होण्याची गरज आहे. शेजारधर्म, सामाजिक जबाबदारी आणि संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

कायद्याच्या दृष्टीने पाहता, अशा गुन्ह्यांसाठी कठोरात कठोर शिक्षा होणे गरजेचे आहे. जलदगती न्यायालयांमार्फत या प्रकरणाचा वेगाने निकाल लावून दोषीला कठोर शिक्षा दिली गेली, तरच समाजात योग्य संदेश जाईल. अन्यथा अशा विकृत प्रवृत्तीला आळा बसणार नाही.

यासोबतच, बालकांच्या सुरक्षेसाठी शाळा, स्थानिक प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांनी एकत्र येऊन जनजागृती करणे आवश्यक आहे. मुलांना 'गुड टच-बॅड टच' याबाबत शिक्षण देणे, तसेच त्यांना धैर्याने आवाज उठवण्यास प्रोत्साहन देणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

ही घटना केवळ एक गुन्हा नसून, ती आपल्या समाजाच्या आरशात दिसणारी कुरूप वास्तवता आहे. आता वेळ आली आहे ती केवळ निषेध करण्याची नाही, तर ठोस कृती करण्याची. प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारून अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी सजग राहणे हीच खरी त्या निष्पाप चिमुकलीला श्रद्धांजली ठरेल. अशा गुन्ह्यांविरोधात शून्य सहिष्णुतेची भूमिका घेतली गेली पाहिजे, ही काळाची गरज आहे. समाज, प्रशासन आणि कायदा यंत्रणा एकत्र येऊनच सुरक्षित भविष्य घडवू शकतात. हीच वेळ आहे, जेव्हा आपण फक्त बोलणे थांबवून कृतीतून बदल घडवून आणला पाहिजे.

## ।। अभंगवाणी ।।



न बोलेसी करा वाचा ।
उपाधीचा संबंध ॥१॥

एका तुमच्या नामाविण ।
अवघा सीण कळतसे ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मिसिंग लिंक लोकार्पणानंतर २४ तासांनी सेवेत

## मुंबई-पुणे मिसिंग लिंक : पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेबद्दल वाहनचालक-प्रवाशांकडून नाराजी

**महाईन्यूज । मुंबई**

**मुंबई – पुणे द्रुतगती महामार्गावरील मिसिंग लिंकच्या लोकार्पणानंतर काही तासांनी वाहतुकीसाठी खुली होईल असे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) जाहीर केले होते. त्यानुसार लोकार्पणानंतर काही वेळातच मुंबई-पुणे मार्गिका खुली करण्यात आली असून प्रवाशांना दिलासा मिळाला.**



मात्र त्याचवेळी मिसिंग लिंकवरील पुणे – मुंबई मार्गिका शुक्रवारी रात्री उशीरापर्यंत खुली झालीच नाही. ही मार्गिका शनिवारी सकाळी मार्गिका खुली होईल असे अपेक्षित होते. परंतु शनिवारी सकाळीही ही मार्गिका खुली होण्यासाठी वाहनचालक-प्रवाशांना प्रतीक्षा करावी लागली, वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागल्याने वाहनचालक, प्रवाशांनी प्रचंड नाराजी व्यक्त केली. अखेर शनिवारी दुपारी १ च्या सुमारास पुणे-मुंबई मार्गिका वाहतुकीसाठी खुली झाली आणि प्रवासी-वाहनचालकांनी सुटकेचा निश्वास सोडला.

एमएसआरडीसीने खोपोली – कुसगाव दरम्यान १३.३ किमी लांबीची नवीन मार्गिका अर्थात मिसिंग लिंक बांधली. या मिसिंग लिंकचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुक्रवारी दुपारी १ च्या सुमारास झाले. लोकार्पणानंतर तात्काळ मुंबई-पुणे मार्गिका वाहतुकीसाठी खुली करून वाहतूक कोंडीत अडकलेल्या वाहनचालक-प्रवाशांना दिलासा देण्यात आला. तर पुणे-मुंबई मार्गिकेवर लोकार्पणाच्या कार्यक्रमासाठी मंडप उभारण्यात आला होता. हा मंडप काढून मार्गिका रिकामी करण्यासाठी लागणारा वेळ लक्षात घेऊन सायंकाळी ६ पर्यंत मार्गिका खुली केली जाईल असे एमएसआरडीसी आणि वाहतूक पोलिसांनी सांगितले. मात्र शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता मार्गिका खुली झालीच नाही. रात्री उशिरापर्यंत मंडप काढून मार्गिका वाहतुकीसाठी खुली केली जाईल असे वाटत होते. परंतु पुणे-मुंबई मिसिंग लिंक मार्गिका शुक्रवारी खुली झालीच नाही. शनिवारी सकाळीही मार्गिका बंद असल्याने मिसिंग लिंकवरून अतिजलद प्रवास करण्यासाठी निघालेल्या वाहनचालक-प्रवाशांना चांगलाच मनस्ताप सहन करावा लागला. त्यांना जुन्याच महामार्गाने घाटातून प्रवास करावा लागला. घाटात प्रचंड वाहतूक कोंडी झाली. शुक्रवारी वाहतूक कोंडीचा सामना करावा लागल्यानंतर पुन्हा शनिवारी मिसिंग लिंकच्या लोकार्पणानंतरही वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत असल्याने वाहनचालक-प्रवाशांकडून संतप्त प्रतिक्रिया उमटत होत्या.

### 'कनेक्टिंग' नव्हे 'मिसिंग लिंक'च

मोठ्या दिमाखात मिसिंग लिंकचे लोकार्पण शुक्रवारी करण्यात आले. लोकार्पणाच्या वेळी झालेल्या वाहतूक कोंडीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलगिरी व्यक्त केली. त्याचवेळी यापुढे कोणालाच महामार्गावर वाहतूक कोंडीत अडकावे लागणार नाही याची खात्री मी देतो असेही म्हटले. तर ही 'मिसिंग लिंक' नसून अतिजलद प्रवासाची 'कनेक्टिंग लिंक' असल्याचेही ते यावेळी म्हणाले. मिसिंग लिंक खुली झाल्यानंतर वाहतूक कोंडी होणार नाही याची खात्री मुख्यमंत्र्यांनी दिली खरी, मात्र मिसिंग लिंकवरील पुणे-मुंबई मार्गिका शनिवारी दुपारी १ पर्यंत बंदच होती. त्यामुळे पुणे-मुंबई प्रवास करणाऱ्यांना घाटातूनच वाहतूक कोंडीतून प्रवास करावा लागला. वाहनचालक-प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला. मनसे नेते अभिजित पानसेही शनिवारी पुणे-मुंबई प्रवासादरम्यान दीड तास वाहतूक कोंडीत अडकले होते. मिसिंग लिंकवरून अतिजलद प्रवास करता येईल असे वाटत असताना दीड तास कोंडीत अडकावे लागल्याने ते चांगलेच संतापले.

---

# नागपुरात खळबळ ! आई अन् विवाहित मुलीचा गळफास, दोन महिन्यापूर्वी मुलीच्या बाळाचा मृत्यू

**महाईन्यूज । नागपुर**

**विवाहित मुलीने व तिच्या आईने गळफास घेऊन आत्महत्या केल्यामुळे व्यंकटेशनगर परिसरात खळबळ उडाली आहे. आत्महत्येपूर्वी दोघींनी सुसाईड नोट लिहून आमच्यावर भंडारातील मौदा येथे अंत्यसंस्कार करण्यात यावे, असे नमूद केले. या प्रकरणी नंदनवन पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरु केला आहे. आत्महत्या केलेल्या मुलीला दोन महिन्यापूर्वी बाळ होऊन त्याचा मृत्यू झाला होता.**



संगीता श्रीराम ढबाले (५२, रा. व्यंकटेशनगर) असे आत्महत्या केलेल्या आईचे तर आकांक्षा लोकेश ब्रह्मे (२९, रा. ओमनगर सक्करदरा) असे आत्महत्या केलेल्या मुलीचे नाव आहे. नंदनवन पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार संगीता या शिक्षिका होत्या. तर आकांक्षा बँकेत नोकरी करीत होत्या. आकांक्षा यांना दोन महिन्यापूर्वी मुलगी झाली होती. परंतु जन्मानंतर मुलीचा मृत्यू झाला. त्यानंतर त्या आपली आई संगीता यांच्याकडे आराम करण्यासाठी व्यंकटेशनगर येथे माहेरी गेल्या होत्या.

दोन महिन्यांपासून आकांक्षा तिची आई संगीता यांच्याकडे राहत होती. शुक्रवारी १ मे २०२६ रोजी आकांक्षाचे पती लोकेश सुधाकर ब्रह्मे (३०) हे घरी आले. त्यांनी दार ठोकूनही आतुन कोणीच प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी खिडकीतून पाहिले असता त्यांना आपली पत्नी व सासु गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसल्या. त्यांनी शेजारी व नातेवाईकांना बोलावले. दार तोडून त्यांनी आकांक्षाला खाली उतरविले. त्यानंतर नंदनवन पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. नंदनवन पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक कैलाश देशमाने यांना माहिती मिळताच नंदनवन पोलिस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी मेडिकलमध्ये पाठविले. दरम्यान आत्महत्येपूर्वी आई व मुलीने सुसाईड नोट लिहून त्यात आमच्या आत्महत्येबाबत कोणालाच दोषी ठरवू नये, असा उल्लेख केल्याची माहिती नंदनवन पोलिसांनी दिली आहे.

या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. प्राथमिक तपासात मानसिक ताण आणि वैयक्तिक कारणांमुळे त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. पोलिस पुढील तपास करत असून घटनेमागील नेमके कारण शोधण्याचा प्रयत्न सुरू आहे. मृत्यूमुळे दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दरम्यान, अशा घटनांना आळा घालण्यासाठी समुपदेशनाची गरज असल्याचे मतही व्यक्त होत आहे. या प्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून अधिक तपास सुरू आहे. परिसरातील नागरिकांनी अशा प्रसंगी कुटुंबीयांनी एकमेकांना आधार देण्याची गरज असल्याचे सांगितले. समाजात मानसिक आरोग्याबाबत जागरूकता वाढविण्याची आवश्यकता यानिमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

### पतीने केलेल्या छळामुळे गळफास घेतल्याचा आरोप

आकांक्षाच्या वडिलांचा १० वर्षांपूर्वी मृत्यू झाला होता. त्यानंतर दोन वर्षांपूर्वी तिचे लोकेश सोबत लग्न झाले. परंतु आकांक्षाचे मावसभाऊ विशाल सोनटक्के यांनी आकांक्षाचा पती लोकेश संपत्तीच्या वादातून तिचा छळ करीत होता. त्या छळातूनच मावशी व आकांक्षाने आत्महत्या केली, असा आरोप केला आहे. दरम्यान सुसाईड नोटमध्ये दोघींनी आमचा अंत्यसंस्कार भंडारातील मौदा येथे वडिलांवर अंत्यसंस्कार केले त्या ठिकाणी करण्याबाबत उल्लेख केला आहे.

# पर्यटकांनी लाईफ जॅकेट घातले नव्हते

## जबलपूरमध्ये झालेल्या बोट दुर्घटनेतील चालकाने सांगितला सर्व घटनाक्रम

**महाईन्यूज । जबलपूर**

**मध्य प्रदेशच्या जबलपूरमधील बार्गी धरणात घडलेल्या बोट दुर्घटनेमुळे संपूर्ण देशात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेत नऊ जणांचे मृतदेह आढळले असून आणखी बेपत्ता सहा जणांचा शोध सुरू आहे. या घटनेत एका आई व मुलाचा फोटो समोर आल्यानंतर अनेकांचे हृदय पिळवटून निघाले. मृत्यू समोर असतानाही आईने मुलाला आपल्या पोटाशी धरून ठेवले होते. २८ जणांना या दुर्घटनेतून वाचविण्यात यश आले. ज्यात बोटीचा चालक महेश पटेल हाही होता. आता महेश पटेल यांचीही प्रतिक्रिया समोर आली आहे.**



बोटीत पाणी शिरल्यानंतर मी शक्य तितक्या प्रवाशांना वाचविण्याचा प्रयत्न केला, असे सांगतान महेश पटेलने नऊ मृत्यू झाल्याबद्दल माफी मागितली.

महेश पटेलने ३० एप्रिल रोजीचा घटनाक्रमही उलगडून सांगितला. ते म्हणाले, आम्ही जेव्हा खमरिया बेटावरून बोट घेऊन निघालो, तेव्हा हवामान सामान्य होते. पण जलाशयाच्या मध्यभागी पोहोचल्यानंतर जोरात वारे सुरू झाले. आम्ही परत फिरावे आणि हवामान खराब असल्याचा कोणताही इशारा किंवा पूर्वसूचना देण्यात आलेली नव्हती. वाऱ्याचा वेग तीव्र झाल्याने आणि लाटा बोटीवर आदळू लागल्याने आम्ही बोट किनाऱ्याकडे परत वळविण्याचा निर्णय घेतला.

महेश पटेल पुढे म्हणाले, बोटीत पाणी शिरू लागल्याने प्रवासी घाबरले. पाणी आत शिरल्यानंतर मी कंट्रोल डेस्कला फोन करून दुसरी बोट पाठविण्यास सांगितले. तसेच या अपघातामधून वाचलेल्यांनी आरोप केला की, जोराने वाहणारा वारा आणि हेलकावे खाणारी बोट पाहून काही प्रवाशांनी बोट माघारी फिरवण्याची विनंती केली होती. मात्र पटेल यांनी हे नाकारताना म्हटले की, मला कुणीही अपघाताबद्दल इशारा दिला नव्हता.

महेश पटेल गेल्या १५ वर्षांपासून येथील जलाशयात बोट चालविण्याचे काम करत आहेत. ते म्हणाले, जल पर्यटनाला सुरुवात केल्यानंतर पुढच्या ३० मिनिटांत ही दुर्घटना घडली. हवामान इतक्या वेगात बदलले की, पुढे काही क्षणात होत्याचे नव्हते झाले. इंजिन रुममध्ये पाणी शिरल्यानंतर बोटीवरील नियंत्रण सुटले आणि ही बोट किनाऱ्यापर्यंत पोहोचू शकणार नाही, याची जाणीव झाली.

या दुर्घटनेचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. ज्यात बोटीच्या खालच्या डेकमध्ये पाणी शिरू लागल्यानंतर कर्मचारी प्रवाशांना लाईफ जॅकेटचे वाटप करत आहेत.

### अपघात नेमका कसा घडला?

जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितल्यानुसार, धरण परिसरात अचानक आलेले वादळ, क्रूझ बोटीच्या वरच्या डेकवर आणि खाली पर्यटक ये-जा करत असल्यामुळे गुरुत्वाकर्षण केंद्रात झालेला बदल यांसारख्या घटनांच्या एकत्रित परिणामामुळे ही घटना घडली असावी. जिल्हाधिकारी राघवेंद्र सिंह यांच्या म्हणण्यानुसार, सुमारे ९० लोकांची क्षमता असलेल्या बोटीत केवळ ४० प्रवासी होते. बार्गी धरणाच्या जलाशयाचा आनंद लुटण्यासाठी सुरू झालेला प्रवास अपघातामुळे एका भयंकर शोकांतिकेत बदलला.

महेश पटेल यांनी याबाबत बोलताना सांगितले की, अनेक प्रवाशांनी सुरुवातीला लाईफ जॅकेट घेण्यास नकार दिला होता. कारण त्यांना नाचायचे होते, मजा करायची होती. महेश पटेल आणि बोटीवरील कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली असून त्यांना निलंबित करण्यात आले आहे. बोटीवर तीन कर्मचारी असणे आवश्यक होते. मात्र दोनच कर्मचारी होते. त्यामुळे बोट बुडत असताना मी जास्तीत जास्त प्रवाशांना लाईफ जॅकेट घातले. तसेच बोटीतून मी सर्वात शेवटी बाहेर पडलो.

बोटीवरील मदतनीस छोटेलाल गोंड आणि तिकीट खिडकीवरील कर्मचारी ब्रिजेंद्र यांनाही कामावरून काढून टाकण्यात आले आहे. नोकरी गेल्यामुळे माझ्या कुटुंबावरही संकट निर्माण झाले आहे. मी मृतांच्या कुटुंबियांची माफी मागतो. मला मानसिक धक्का बसला आहे. ही घटना घडल्यापासून मला जेवण जात नाही, झोपही येत नाही. हा अपघात एक नैसर्गिक आपत्ती होती. बोट चालविण्याचा माझ्याकडे वैध परवाना आहे. मी प्रशिक्षणही घेतले असून त्यात जीवरक्षक प्रमाणपत्रांचाही समावेश आहे. दर दोन वर्षांनी प्राधिकरणांकडून दिले जाणारे प्रशिक्षण मी घेत असतो, असाही दावा महेश पटेल यांनी केला.

---

# 'आखातात अमेरिकेला स्थान असेल तर फक्त समुद्राच्या तळाशी'; खामेनी कडाडले

**महाईन्यूज । तेहरान**

**आम्ही आणि पर्शियन आखात तसेच ओमानच्या आखातातील आमचे शेजारी देश एकाच नशिबाचे वाटेकरी आहोत. परकीय हजारो किलोमीटर दुरून इकडे हाव आणि द्वेषाने येतात, त्यांना या भागात स्थान नाही. असलेच तर ते केवळ समुद्राच्या तळाशी स्थान आहे, अशा शब्दांमध्ये इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला मोजतबा खामेनी यांनी अमेरिकेवर हल्लाबोल केला.**





अमेरिकेचा उल्लेख 'ग्रेट सैतान' (Great Satan) असा करत, त्यांनी इराणच्या अण्वस्त्र आणि क्षेपणास्त्र क्षमतेबाबत कोणतीही तडजोड करणार नसल्याचे स्पष्ट संकेत दिल्याचे वृत्त 'असोसिएटेड प्रेस'ने दिले आहे.

सरकारी टेलिव्हिजनवर वाचून दाखवण्यात आलेल्या लेखी निवेदनात खामेनी म्हणाले की, इराणचे धोरणात्मक कार्यक्रम हे 'चर्चेचा विषय' (non-negotiable) नसून ते राष्ट्रीय सार्वभौमत्वासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. तसेच, पर्शियन आखाती प्रदेशात अमेरिकेला कोणतेही स्थान नाही, असेही त्यांनी ठणकावले. खामेनी यांनी इराणच्या तांत्रिक आणि लष्करी क्षमतेचे वर्णन 'राष्ट्रीय संपत्ती' असे केले. "देशांतर्गत आणि परदेशात राहणारे ९० दशलक्ष (९ कोटी) अभिमानी इराणी नागरिक इराणची ओळख, आध्यात्मिक, मानवी, वैज्ञानिक आणि तांत्रिक क्षमतांना आपली राष्ट्रीय संपत्ती मानतात. नॅनो-टेक्नॉलॉजी, बायोटेक्नॉलॉजीपासून ते अण्वस्त्र आणि क्षेपणास्त्र क्षमतेपर्यंत, प्रत्येक गोष्टीचे रक्षण ते आपल्या भूमी आणि आकाशाप्रमाणेच करतील," असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

सध्या युद्धविराम असला तरी, अमेरिका आणि इराण यांच्यात निर्बंध, अण्वस्त्र चर्चा आणि सागरी नियंत्रणावरून वाद सुरूच आहे. इराणने आपल्या अण्वस्त्र कार्यक्रमावरील चर्चा लांबणीवर टाकण्याचे प्रस्ताव दिले आहेत, तर वाशिंग्टनने इराणला अण्वस्त्रे विकसित करण्यापासून रोखण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

### जागतिक तेल बाजारावर सावट

पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर हे विधान समोर आले आहे. निर्बंधांमुळे इराणच्या तेल क्षेत्रावर परिणाम होत असून टँकरच्या वाहतुकीत अडथळे येत आहेत. यामुळे जागतिक तेल बाजारात अस्थिरता निर्माण झाली असून, 'ब्रेंट क्रूड'च्या किमती प्रति बॅरल १२६ डॉलर्सपर्यंत पोहोचल्या होत्या. जगातील एकूण तेल आणि वायू पुरवठ्यापैकी सुमारे एक पंचमांश भाग 'हॉर्मुझची सामुद्रधुनी' (STRAIT OF HORMUZ) मधून जातो. या महत्वाच्या जलमार्गावर इराणचे सामरिक वर्चस्व असल्याने ऊर्जा बाजारात मोठी खळबळ उडाली आहे. या परिस्थितीमुळे जागतिक अर्थव्यवस्थेवरही मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# श्रद्धाने केले बॉयफ्रेंडचे कौतुक



श्रद्धा कपूर बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. ती सोशल मीडियावर खूप सक्रिय असून तिचा मोठा चाहतावर्ग आहे. तिच्या दैनंदिन जीवनातील घडामोडी ती सोशल मीडियावर चाहत्यांसोबत शेअर करत असते. साधी राहणीमान आणि सहज स्वभावामुळे ती अनेकांना आपलीशी वाटते. अशातच नुकतेच श्रद्धाने तिच्या बॉयफ्रेंडचे सोशल मीडियावर कौतुक केले आहे. श्रद्धा तिच्या व्यावसायिक आयुष्यासोबत खासगी आयुष्यामुळेही सतत चर्चेत असते. आता तिचा बॉयफ्रेंड राहुल मोदीचे सोशल मीडियावरून कौतुक केल्याने ती पुन्हा चर्चेत आली आहे. श्रद्धा अनेकदा राहुलसोबतचे फोटो आणि व्हिडिओ पोस्ट करत असते. अलीकडेच राहुल मोदीच्या नवीन जाहिरातीनिमित्त तिने इन्स्टाग्रामवर स्टोरी शेअर केली आहे. श्रद्धाच्या पोस्टनुसार राहुलने या जाहिरातीचे लेखन आणि दिग्दर्शन केले आहे. या जाहिरातीत 'सायारा' चित्रपटातून लोकप्रिय झालेली अभिनेत्री अनित पड्डा झळकत आहे. श्रद्धाने हा व्हिडिओ इन्स्टाग्राम स्टोरीमध्ये शेअर करत लिहिले की, "क्युटनेस आणि सर्वोत्तम अभिनयाचे उत्तम मिश्रण म्हणजे अनित पड्डा आणि क्युटनेसवरून आठवले तर हा लेखक आणि दिग्दर्शक किती हुशार आहे." तिने अनित पड्डा आणि राहुल मोदीला टॅगही केले आहे. श्रद्धा आणि राहुल यांच्या रिलेशनशिपच्या चर्चा २०२४ च्या सुरुवातीला सुरू झाल्या. मुंबईतील डिनर डेटनंतर दोघे एकत्र दिसल्यानंतर त्यांच्या डेटिंगच्या अफवा रंगल्या. मात्र, दोघांनीही याबाबत अधिकृतपणे काहीही स्पष्ट केलेले नाही. तरीही ते अनेकदा एकत्र दिसतात आणि श्रद्धा सोशल मीडियावर त्यांचे फोटो-व्हिडिओ शेअर करत असते. काही काळ त्यांच्या ब्रेकअपच्या अफवाही पसरल्या होत्या. मात्र, डिसेंबर २०२४ मध्ये श्रद्धाने राहुलसोबत वडापाव डेटचा फोटो शेअर करत त्या चर्चांना पूर्णविराम दिला होता. त्यानंतर दोघे अनेक कार्यक्रमांमध्ये एकत्र दिसले आहेत. अलीकडेच त्यांच्या लग्नाच्या चर्चाही रंगल्या होत्या, मात्र श्रद्धाची मावशी आणि अभिनेत्री तेजस्विनी कोल्हापुरे यांनी याबाबत काहीही माहिती नसल्याचे स्पष्ट केले. श्रद्धा शेवटची २०२४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'स्त्री २' या चित्रपटात दिसली होती. या हॉरर-कॉमेडी चित्रपटात तिच्यासोबत राजकुमार राव आणि पंकज त्रिपाठी यांनी महत्त्वाच्या भूमिका साकारल्या होत्या. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरला आणि जगभरात ८५० कोटी रुपयांहून अधिक कमाई केली. आगामी काळात श्रद्धा 'पहाडपंगिरा' या चित्रपटात दिसण्याची चर्चा आहे. हा चित्रपट 'तुम्बाड'चा प्रीक्वेल मानला जात आहे. तसेच मराठी लोककलेतील प्रसिद्ध कलाकार विठाबाई नारायणगावकर यांच्या आयुष्यावर आधारित 'ईठा' या बायोपिकमध्येही श्रद्धा झळकणार असल्याची शक्यता आहे.





# बोल्ड, स्टनिंग अन् गॉर्जियस फातिमा

बॉलिवूड अभिनेत्री फातिमा सना शेख सध्या तिच्या बोल्ड फोटोशूटमुळे सोशल मीडियावर चांगलीच चर्चेत आली आहे. समुद्रकिनारी केलेल्या या खास फोटोशूटमुळे तिच्या चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून तिच्या पोस्टवर लाईक्सचा पाऊस पडत आहे. फातिमाने लाल रंगाच्या बिकिनीमध्ये समुद्रकिनारी हे फोटोशूट केले असून, तिचा आत्मविश्वासपूर्ण आणि ग्लॅमरस अंदाज चाहत्यांना विशेष भावला आहे. या फोटोंमधून तिचा फिटनेस, स्टाईल आणि नैसर्गिक सौंदर्य ठळकपणे दिसून येते. अनेक चाहत्यांनी तिच्या लूकचे कौतुक करत तिला "स्टनिंग", "गॉर्जियस" अशा प्रतिक्रिया दिल्या आहेत. व्यस्त शूटिंग शेड्यूलमधून वेळ काढत फातिमाने सुट्टी एन्जॉय केली. मित्र-मैत्रिणींसोबत तिने समुद्रकिनारी घालवलेले क्षण तिच्यासाठी खास ठरले. तिच्या सोशल मीडिया पोस्टमधून ती निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवण्याला किती महत्त्व देते, हेही दिसून आले. या शूटसोबतच फातिमाने एक भावनिक आणि साधा संदेशही शेअर केला आहे. "मला आनंदी करायचं असेल तर मला डोंगरावर किंवा समुद्रकिनारी फिरायला घेऊन जा. अजून काही नको," असे ती म्हणाली आहे. तिच्या या साध्या विचारांनी अनेक चाहत्यांची मनं जिंकली आहेत. तिने पुढे लिहिले की, "चांगला ट्रॅव्हल पार्टनर असणं हेच खरं सुख आहे," अशा शब्दांत तिने प्रवासाविषयीची आपली आवड व्यक्त केली. फातिमा सना शेखने 'दंगल' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये दमदार एंट्री केली होती. या चित्रपटासाठी तिने केलेली मेहनत आणि तिचा फिटनेस आजही चर्चेचा विषय ठरतो. 'दंगल'नंतर तिने विविध प्रकारच्या भूमिका साकारत आपल्या अभिनयाची छाप पाडली आहे. लव्हस्टोरी, ॲक्शन, ड्रामा अशा विविध शैलींमध्ये ती झळकली आहे. तिच्या अभिनयाइतकाच तिचा व्यक्तिमत्त्वही प्रेक्षकांना आकर्षित करत असतो. सोशल मीडियावर ती नेहमी सक्रिय असून चाहत्यांशी संवाद साधत असते. तिच्या पोस्टमधून तिचा साधेपणा, प्रवासाची आवड आणि आयुष्याकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन स्पष्ट दिसतो.

# जेमिसनला BCCIने घडवली अद्दल

## १५ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीबरोबर पंगा घेणं पडलं महागात!

**महाईन्यूज | नवी दिल्ली**

**राजस्थान रॉयल्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात १ मे रोजी आयपीएलमधील सामना खेळवण्यात आला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना राजस्थानने २२५ धावांचा डोंगर उभारला होता. प्रत्युत्तरात दिल्लीने पथुम निसांका व केएल राहुलच्या मॅचविनिंग भागीदारीच्या बळावर सहज सामना जिंकला. या सामन्यात लक्षवेधी चेहरा असलेला वैभव सूर्यवंशी मात्र फेल ठरला. पण या सामन्यादरम्यान वैभव सूर्यवंशीबरोबर पंगा घेतल्याचा फटका दिल्लीच्या खेळाडूला बसला आहे.**



वैभव सूर्यवंशीने काईल जेमिसनच्या षटकातील पहिल्याच चेंडूवर लाँग ऑफवरून चौकार लगावला. वैभवने आपल्या डावातील दुसऱ्याच चेंडूवर मोठा फटका मारण्याचा प्रयत्न केला, पण जेमिसनच्या कमालीच्या यॉर्करचा अंदाज घेण्यात तो अपयशी ठरला आणि क्लीन बोल्ड होत बाद झाला. त्यानंतर जेमिसनने मोठ्याने गर्जना करत वैभवच्या दिशेने येत आक्रमकपणे जल्लोष केला. वैभव सूर्यवंशीच्या जवळ जाऊन केलेल्या या आक्रमक सेलिब्रेशनचा जेमिसनला चांगलाच फटका बसला आहे.

सामन्यानंतर, काईल जेमिसन आयपीएल आचारसंहितेच्या लेव्हल १चे उल्लंघन केल्याबद्दल दोषी आढळला, त्याला सक्त ताकीद आणि एक डिमेरिट पॉइंट देण्यात आला. काईल जेमिसनने आयपीएल आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचा आपला गुन्हा कबूल केला आहे. आयपीएलने जारी केलेल्या एका निवेदनात, जेमिसनला आचारसंहितेच्या कलम २.५ चे उल्लंघन केल्याबद्दल दोषी ठरवण्यात आले आहे. हे कलम एका खेळाडूच्या अशा कृती किंवा प्रतिक्रियेसंबंधी आहे, ज्यामुळे दुसरा खेळाडू संतापू शकतो.




# महिला टी-२० विश्वचषक २०२६ साठी भारतीय महिला संघाची घोषणा

**महाईन्यूज | मुंबई**

**महिला टी-२० विश्वचषक २०२६ साठी भारतीय महिला संघाची घोषणा करण्यात आली आहे. पुरूषांच्या टी-२० विश्वचषकानंतर यंदा महिला टी-२० विश्वचषक २०२६ यंदा खेळवला जाणार आहे. यंदाचा महिला वर्ल्डकप इंग्लंड आणि वेल्समध्ये होणार आहे. २०२५ मध्ये हरमनप्रीत कौरच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघाने वनडे विश्वचषकावर आपलं नाव कोरलं होतं. यानंतर आता महिला टी-२० विश्वचषक जिंकण्यावर टीम इंडियाच्या नजरा आहेत. अनेकदा विजयाच्या उंबरठ्यावर येत जेतेपदापासून एक पाऊल दूर राहिल्यानंतर आता हा विश्वचषक मायदेशी आणण्याचं ध्येय हरमन आणि संघाचं असणार आहे.**



### टी-२० विश्वचषक २०२६ साठी भारतीय संघ

हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना (उपकर्णधार), शफाली वर्मा, जेमिमा रोड्रीग्ज, ऋचा घोष (यष्टीरक्षक), भारती फुलमाली, दीप्ती शर्मा, यस्तिका भाटिया (यष्टीरक्षक), श्री चरणी, नंदिनी शर्मा, अरूंधती रेड्डी, रेणुका ठाकूर, क्रांती गौड, श्रेयंका पाटील, राधा यादव.

१४ जून ते ५ जुलै यादरम्यान टी-२० विश्वचषक २०२६ खेळवला जाणार आहे. कर्णधार हरमनप्रीत कौरच्या नेतृत्त्वाखाली टीम इंडियाचं संघ इंग्लंड आणि वेल्समधील टी-२० विश्वचषक खेळणार आहे. स्मृती मानधना संघाची उपकर्णधार असणार आहे. तर यस्तिका भाटिया व ऋचा घोष या विकेटकिपर असतील. यस्तिका भाटिया फिट झाल्यामुळे ती दोन जबाबदाऱ्या एकावेळी पार पाडू शकते, यानुसार प्रतिका रावलच्या जागी तिची निवड करण्यात आली आहे. यानंतर स्मृती मानधनासह शफाली वर्मा सलामीला उतरेल यानंतर मधल्या फळीत जेमिमा रोड्रिग्ज, ऋचा घोष, भारती फुलमाली या फलंदाज असतील.

अष्टपैलू खेळाडू आणि वनडे विश्वचषक २०२५ मध्ये संघाची मॅचविनर ठरलेल्या अमनजोत कौरला दुखापत झाल्याने तिच्या रूपात संघाला मोठा फटका बसला आहे. दक्षिण आफ्रिकेविरूद्ध टी-२० मालिकेसाठी अमनजोत कौरची बदली खेळाडू म्हणून काश्वी गौतमची निवड करण्यात आली होती, पण दुर्देवाने काश्वीलाही दुखापत झाली आहे, त्यामुळे तिची निवड करण्यात आली नाही. या दोघींशिवाय अष्टपैलू खेळाडू राधा यादव हिची संघात निवड करण्यात आली आहे.

दक्षिण आफ्रिकेविरूद्ध नुकत्याच झालेल्या टी-२० मालिकेत भारतीय संघाला ४-१ ने पराभव पत्करावा लागला. यानंतर गोलंदाजी विभागाला अधिक भक्कम करण्याच्या विचाराने संघनिवड करण्यात आली. काश्वी गौतम व अमनजोत कौर या वेगवान गोलंदाजदेखील होत्या. त्यामुळे त्यांच्या अनुपस्थितीत वुमन्स प्रीमियर लीग २०२६ मध्ये अखेरच्या षटकात हॅटट्रिक घेणाऱ्या नंदिनी शर्माला संधी देण्यात आली आहे. नंदिनीची पहिल्यांदाच भारतीय संघात निवड झाली असून थेट टी-२० विश्वचषकात तिला खेळण्याची संधी मिळण्याची शक्यता आहे. याशिवाय अरूंधती रेड्डी, रेणुका ठाकूर, क्रांती गौड या वेगवान गोलंदाज आहेत. तर श्रीचरणी, श्रेयंका पाटील, शफाली वर्मा व राधा यादव या अष्टपैलू खेळाडू आहेत.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। रविवार ।
दि. 03 मे 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## ‘घरोघरी महापौर’ उपक्रमातून नागरिकांचा आवाज महापौरांपर्यंत

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा मानत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे ‘घरोघरी महापौर’ अभियान राबविण्यात येत आहे. “तुमचा अभिप्राय – आपल्या शहराच्या विकासाचा पाया!” या संकल्पनेवर आधारित या उपक्रमाद्वारे नागरिकांचा आवाज थेट महापौर रवि लांडगे यांच्यापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.**



> “पिंपरी चिंचवड शहराचा खरा विकास नागरिकांच्या सहभागातूनच शक्य आहे. ‘घरोघरी महापौर’ अभियानाद्वारे आम्ही प्रत्येक नागरिकाचा आवाज ऐकण्याचा आणि त्यानुसार शहरातील विकासाला आणखी गती देण्याचा प्रयत्न करत आहोत. या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून आपल्या परिसराच्या आणि शहराच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान द्यावे.
>
> – रवि लांडगे, महापौर.

पिंपरी चिंचवड महापालिकेकडून देण्यात येणाऱ्या विविध सोयी-सुविधांबाबत नागरिकांचे मत जाणून घेण्यासाठी राबवण्यात येत असलेल्या या अभियानांतर्गत केवळ ५ सोप्या प्रश्नांच्या माध्यमातून नागरिकांचा अभिप्राय नोंदविण्यात येणार आहे. या अभिप्रायाच्या आधारे शहराच्या विकासात्मक निर्णय प्रक्रियेला अधिक गती मिळणार आहे.

नागरिकांकडून मिळणारा अभिप्राय हा शहराच्या नियोजनात आणि सेवा सुधारण्यात अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य सुविधा यांसारख्या मूलभूत सेवांबाबत थेट नागरिकांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्यामुळे प्रशासनाला प्राधान्यक्रम निश्चित करण्यात मदत होणार आहे. त्यामुळे अधिक परिणामकारक आणि लोकाभिमुख निर्णय घेण्यास मदत होणार आहे. या उपक्रमामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक मजबूत होणार असून पारदर्शकतेलाही चालना मिळणार आहे.

### असा घ्या सहभाग :

- ‘सिद्धी’ ॲपच्या माध्यमातून माहिती संकलित करण्यासाठी बचत गटांच्या महिला नागरिकांच्या घरोघरी भेट देणार आहेत.
- ‘घरोघरी महापौर’ उपक्रमांतर्गत त्या नागरिकांना ५ प्रश्न विचारतील.
- प्रत्येक प्रश्नासाठी उपलब्ध पर्याय नागरिकांना सांगितले जातील.
- नागरिकांनी निवडलेल्या पर्यायाची नोंद संबंधित महिला ‘सिद्धी’ ॲपमध्ये करतील.

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026



DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.
It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.

UG/PG Programs
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

2025 Excellence in Chemical Engineering for a Sustainable Future
2025 Bright Blue Print in Civil Engineering Education
2025 Creative Excellence in Film Studies & Media Research
2024 Excellence in Digital Disruption
2024 Most Promising Engineering University in India
2024 Game Changer in Bioengineering Education
2024 Trailblazer in Semiconductor Engineering

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# डिजिटल जनगणनेत सहभागी व्हा, देशाच्या प्रगतीत हातभार लावा!

## भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांचे नागरिकांना आवाहन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात १६ व्या राष्ट्रीय जनगणनेचा ऐतिहासिक टप्पा सुरू झाला आहे. १ मे २०२६ पासून देशभरात 'स्व-गणनेला' (SELF-ENUMERATION) प्रारंभ झाला असून, पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांनी या पहिल्या डिजिटल जनगणनेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केले आहे.**

आमदार महेश लांडगे यांनी आज स्वतः आपल्या कुटुंबीयांसह ऑनलाइन पद्धतीने स्व-गणना पूर्ण केली. यावेळी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाचे अधिकारी सुरज टिंगरे, किरण गव्हाणे, अरुण गुंडगळ, राहुल शेडगे उपस्थित होते.

या मोहिमेबाबत माहिती देताना आमदार लांडगे म्हणाले की, "ही देशातील पहिली डिजिटल जनगणना असून प्रत्येक नागरिकाचा सहभाग यामध्ये मोलाचा आहे. महाराष्ट्रभरातील जनतेने १ ते १५ मे या कालावधीत SE.CENSUS.GOV.IN या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन आपल्या कुटुंबाची माहिती भरावी आणि आपली जबाबदारी पार पाडावी."



### 'आपली जनगणना, आपला विकास'

"आपली जनगणना, आपला विकास हा मंत्र समोर ठेवून आपण सर्वांनी जबाबदार नागरिक म्हणून या प्रक्रियेत सहभागी होणे आवश्यक आहे. डिजिटल माध्यमाचा वापर करून आपली माहिती अचूकपणे नोंदवल्यास देशाच्या भविष्यातील नियोजनाला गती मिळेल," असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. आमदार लांडगे यांनी स्वतः पुढाकार घेतल्यामुळे शहरात या मोहिमेबाबत जनजागृती निर्माण होत असून, जास्तीत जास्त नागरिकांनी १५ मे पूर्वी आपली नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीनेही करण्यात आले आहे.

> "देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अचूक माहिती असणे ही काळाची गरज आहे. १६ व्या राष्ट्रीय जनगणनेच्या निमित्ताने प्रथमच आपल्याला 'डिजिटल स्व-गणने'ची संधी मिळाली आहे. मी माझे कर्तव्य पार पाडले आहे, तुम्हीही आजच आपली नोंदणी पूर्ण करा आणि जबाबदार नागरिकत्वाचा परिचय द्या. आपली जनगणना, आपला विकास' हा मंत्र केवळ शब्द नसून ती आपल्या उज्वल भविष्याची पायाभरणी आहे. चला, डिजिटल जनगणनेत सहभागी होऊन सशक्त भारताच्या निर्मितीत आपले योगदान देऊया!
>
> – महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# नारीशक्तीच्या हक्कासाठी पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाचा बुलंद एल्गार

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**महिलांच्या हक्कांचे प्रतीक असलेल्या 'नारी-शक्ती वंदन अधिनियम' विधेयकाला संसदेत काँग्रेसप्रणित महाविकास आघाडी / इंडी आघाडीने विरोध केल्याने देशातील कोट्यवधी महिलांच्या न्याय्य हक्कांवर घाला घातला गेला आहे. महिला आरक्षणाला विरोध म्हणजे थेट देशातील नारीशक्तीचा अपमान असून, विरोधकांची महिलांविरोधी व कुटुंबप्रणित राजकारणाची मानसिकता पुन्हा एकदा उघडी पडली आहे. महिलांना सत्तेत सहभागी होऊ द्यायचे नाही, हीच भूमिका आज देशासमोर आली असून, ही बाब मातृपूजक भारतासाठी लाजिरवाणी असल्याची भावना नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या मोर्चातून व्यक्त करण्यात आली.**




काँग्रेस आणि विरोधकांच्या अन्यायकारक भूमिकेविरोधात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण तसेच महिला मोर्चा प्रदेशाध्यक्षा आमदार चित्रा वाघ यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी-चिंचवड शहरात 'महिलांचा जनआक्रोश मोर्चा' आयोजित करण्यात आला.

पिंपरी-चिंचवड भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे आणि भाजपा पिंपरी-चिंचवड महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे यांच्या पुढाकाराने झालेल्या या मोर्चात भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांच्या वतीने मोठ्या संख्येने महिला पदाधिकारी तसेच सर्वासामान्य महिला भगिनी सहभागी झाल्या होत्या.

या आंदोलनात विद्यमान नगरसेविका प्रा. सोनाली गव्हाणे यांनी ठाम भूमिका मांडत महिलांच्या हक्कांसाठी आक्रमकपणे आवाज उठवला. त्यांनी सांगितले की, महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्या शक्तींविरोधात रस्त्यावर उतरून लढा देणे ही काळाची गरज आहे.

मोर्चामध्ये काँग्रेस पक्ष व इंडी आघाडीतील त्यांच्या सर्व सहकारी पक्षांचा तीव्र जाहीर निषेध करण्यात आला. पिंपरी-चिंचवड शहरातील पदाधिकारी, महिला कार्यकर्त्या तसेच माता-भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी होत नारीशक्तीचा बुलंद आवाज एकजुटीने मांडला.

> "महिला आरक्षणाला विरोध करणारे काँग्रेस आणि त्यांचे सहकारी विरोधी पक्ष हे केवळ राजकीय पक्ष नाहीत, तर भारतातील तमाम नारीशक्तीच्या स्वाभिमानाचे शत्रू आहेत. त्यांचे महिलांना त्यांच्या न्याय, हक्कापासून तसेच सत्तेपासून दूर ठेवण्याचे षडयंत्र आम्ही भारतीय जनता पार्टीच्या सर्व रणमर्दानी महिला भगिनी कधीही यशस्वी होऊ देणार नाही. भाजपाचे आमदार मा. महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही महिलांच्या स्वाभिमानाच्या रक्षणासाठी काम करत असून शहरातील नारीशक्ती आता शांत बसणार नाही, आमचा हक्क मिळेपर्यंत लढा सुरूच राहील!"
>
> - प्रा. सोनाली गव्हाणे, विद्यमान नगरसेविका.

# भारतीय उच्च शिक्षणाची आता आत्मनिर्भरतेकडे झेप!

## शिक्षण विश्‍व: ‘एआययू’च्या १०० व्या महासभेला पिंपरीत उत्स्फूर्त प्रतिसाद

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ येथे आयोजित भारतीय विद्यापीठ संघ (AIU) ची ऐतिहासिक १०० वी वार्षिक महासभा आणि कुलगुरूंची राष्ट्रीय परिषद उत्साहात पार पडली. “विकसित भारत २०४७” या संकल्पनेवर आधारित या तीन दिवसीय परिषदेने भारतीय उच्च शिक्षण क्षेत्राला नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला.**




देशभरातील कुलगुरू, शिक्षणतज्ज्ञ, धोरणकर्ते आणि विविध विद्यापीठांचे प्रतिनिधी या परिषदेत सहभागी झाले होते. उच्च शिक्षणाच्या भविष्यासंदर्भात सखोल चर्चा, विचारमंथन आणि अनुभवांची देवाणघेवाण या दरम्यान झाली.

सांगता समारंभाला शिक्षण संस्कृती उत्थान न्यासाचे राष्ट्रीय सचिव डॉ. अतुल कोठारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच कुलपती डॉ. पी. डी. पाटील, AIU अध्यक्ष प्रा. विनय कुमार पाठक आणि सरचिटणीस डॉ. पंकज मित्तल यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ. अतुल कोठारी यांनी ‘स्वावलंबनाचे मॉडेल’ उभे करण्यावर भर देत सांगितले की, विद्यापीठांनी आधुनिकतेसोबत भारतीय ज्ञानपरंपरेचे जतन करत आत्मनिर्भर भारताच्या दिशेने वाटचाल करावी. केवळ चर्चेत न राहता प्रत्यक्ष कृतीतून बदल घडवणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

पर्यावरण संवर्धन, मानवी मूल्ये आणि सार्वजनिक आरोग्य यांचा विचार करत शिक्षणाची मांडणी करण्याचे आवाहनही त्यांनी केले. तसेच अभ्यासक्रमांतील परदेशी प्रभाव कमी करून स्वदेशी दृष्टिकोनातून शिक्षण विकसित करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांनी या परिषदेला उच्च शिक्षण क्षेत्रासाठी आत्मपरीक्षणाचा महत्वाचा टप्पा संबोधत, नवोन्मेष, समावेशकता आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सक्षम चौकट उभारण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

प्र-कुलपती डॉ. भाग्यश्री पी. पाटील यांनी आंतरविद्याशाखीय शिक्षण, गुणवत्तापूर्ण संशोधन आणि संस्थांमधील सहकार्य यावर भर देत, बदलत्या जागतिक गरजांनुसार शिक्षण प्रणाली सक्षम करण्याचे आवाहन केले.

परिषदेच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांनी सर्व सहभागी आणि मान्यवरांचे आभार मानले. ही परिषद भारतीय उच्च शिक्षणाच्या वाटचालीतील एक महत्त्वाचा टप्पा ठरल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

> “भारतीय विद्यापीठ संघाचे हे १०० वे संमेलन म्हणजे उच्च शिक्षण क्षेत्रासाठी आत्मचिंतनाचा आणि जबाबदारीची जाणीव करून देणारा महत्त्वपूर्ण क्षण आहे. ‘विकसित भारत शिक्षण अधिष्ठान विधेयक, २०२५’च्या पार्श्वभूमीवर नवोन्मेषाला चालना देणारी, गुणवत्तापूर्ण आणि सर्वसमावेशक शिक्षण व्यवस्था उभारणे अत्यंत आवश्यक आहे.”
>
> **– डॉ. पी. डी. पाटील, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ.**

## भोसरीतील दोन विद्यार्थिनींची राष्ट्रीय शिष्यवृत्ती परीक्षेत बाजी



**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत (NMMS) भोसरीतील श्री टागोर शिक्षण संस्थेच्या श्री स्वामी समर्थ माध्यमिक विद्यामंदिराने घवघवीत यश संपादन केले आहे. शाळेतील श्रेया योगेश कलशेट्टी आणि रेणुका घुले या दोन विद्यार्थिनींची राष्ट्रीय गुणवत्ता यादीत निवड झाली असून, त्यांच्या या यशामुळे परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने २८ डिसेंबर २०२५ रोजी ही परीक्षा घेतली होती. नुकतीच या परीक्षेची अंतिम निवड यादी आणि गुण यादी जाहीर करण्यात आली. २४ फेब्रुवारीला प्राथमिक गुणतालिका जाहीर झाल्यानंतर प्राप्त झालेल्या दुरुस्त्यांचा विचार करून परिषदेने ही अंतिम यादी प्रसिद्ध केली आहे. यामध्ये इंद्रायणीनगर येथील या दोन्ही विद्यार्थिनींनी आपले नाव कोरले आहे.

या यशस्वी विद्यार्थिनींना मार्गदर्शक शिक्षक श्री. बनसुडे सुखदेव उद्धव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल श्री टागोर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. नंदकुमार विठोबा लांडे आणि शाळेचे मुख्याध्यापक श्री. उद्धव विठ्ठल ढोले यांनी त्यांचे विशेष कौतुक केले. कठीण परिस्थितीतही जिद्दीच्या जोरावर मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

## प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे ‘तारे जमीन पर’ विषयावर प्री-स्कूल विद्यार्थ्यांसाठी रंगभरण उपक्रम उत्साहात संपन्न

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मोशी येथील प्रियदर्शनी स्कूल येथे प्री-स्कूल विद्यार्थ्यांसाठी “तारे जमीन पर” या विषयावर आधारित रंगभरण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश लहान विद्यार्थ्यांमधील कल्पनाशक्ती, सर्जनशीलता, सूक्ष्म हालचालींची कौशल्ये तसेच आत्मविश्वास वाढवणे हा होता.**





या रंगभरण उपक्रमात शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग घेतला. विविध रंगांच्या साहाय्याने त्यांनी आपल्या कल्पनांना कागदावर साकार करत आपले विचार आणि भावना व्यक्त केल्या. रंगीत चित्रांमुळे संपूर्ण वर्गखोली आनंदी, उत्साही आणि रंगतदार वातावरणाने भारून गेली होती.

उपक्रमादरम्यान शिक्षकांनी विद्यार्थ्यांना संयमाने मार्गदर्शन करत सतत प्रोत्साहन दिले. प्रत्येक विद्यार्थ्याला मोकळेपणाने रंग वापरण्याची आणि स्वतःची कल्पना व्यक्त करण्याची संधी देण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांच्या हात-डोळा समन्वयात वाढ झाली तसेच एकाग्रता आणि आत्मविश्वास विकसित होण्यास मदत झाली.

विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कलाकृती मोठ्या अभिमानाने सादर केल्या. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि समाधान पाहून पालक व शिक्षकही भारावून गेले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्व-अभिव्यक्तीची सवय लागण्यासोबतच सर्जनशील विचारसरणीला चालना मिळाली.

अशा प्रकारचे शैक्षणिक व सर्जनशील उपक्रम लहान वयातच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात, असे मत शाळेच्या शिक्षकांनी व्यक्त केले. “तारे जमीन पर” या संकल्पनेवर आधारित रंगभरण उपक्रम यशस्वीरीत्या पार पडून विद्यार्थ्यांसह शिक्षकांसाठीही आनंददायी आठवणी देऊन गेला.


PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE
MOSHI
43 YEARS OF
NURTURING VALUES,
EXCELLENCE AND
TOMORROW'S LEADERS.
ADMISSIONS OPEN FOR AY 2026-27
Grade Nursery to Grade V
WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?
43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs
Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development
Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation
+91 9890613333 | +91 9373073077
pgosm05@gmail.com
www.priyadarshanischoolmoshi.in